# राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.05, दौंड
# सशस्त्र पोलीस शिपाई भरती -2021
## प्रेस नोट

दि. 03/08/2023

* * * *

तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना कळविण्यात येते की, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.5, दौंड या गटाचे आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई भरती प्रक्रिया-2021 ची तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी (Provisional Selection & waiting list ) या कार्यालयाचे संदर्भ क्र. समा/गट क्र.5/ आशा-1/सपोशि भरती 2021/ तात्पु निवड/ प्रतिक्षा यादी/3908/2023 दि.28/07/2023 अन्वये दि.28/07/2023 रोजी महाराष्ट्र पोलीस (**www.mahapolice.gov.in**) तसेच राज्य राखीव पोलीस बलाचे (**www.maharashtrasrpf.gov.in**) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा यादी मधील उमेदवारांची मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणीकरीता समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.5 दौंड या कार्यालयात दि.02/08/2023 रोजी सकाळी 10.00 वाजता सत्यप्रत केलेले छायांकीत प्रतीचे दोन संच व फोटोसह न चुकता हजर राहण्याबाबत कळविण्यात आले. तसेच, उमेदवार यांचेसोबत मुळ कागदपत्रे असणे अनिवार्य असुन कागदपत्र पडताळणीकरीता उमेदवारांनी गैरहजर राहु नये, अशा स्पष्ट सुचना देवुनही बरेच उमेदवार (एकुण 55 उमेदवार) हे कागदपत्र तपासणीकरीता गैरहजर राहीलेले आहेत.

त्या अनुषंगाने गैरहजर उमेदवार यांना दि.03/08/2023 रोजी कागदपत्र तपासणी करीता हजर राहणेबाबत त्यांचे भ्रमणध्वनीवर संपर्क केला तरी देखील बरेच उमेदवार (एकुण 32 उमेदवार) हे दि.03/08/2023 रोजी कागदपत्र तपासणीकरीता गैरहजर राहीले आहेत.

तरी, तात्पुरती निवड यादी / प्रतिक्षा यादीतील (Provisional Selection & waiting list ) गैरहजर उमेदवारांना कागदपत्र तपासणी करीता **शेवटची संधी** देण्यात येत असुन गैरहजर उमेदवारांनी **दि.07/08/2023 रोजी सकाळी 10.00 वाजेपर्यंत कोणतेही कारण / सबब न सांगता** वेळेत समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. 05, दौंड येथे त्यांची सर्व मुळ कागदपत्रे, सत्यप्रत केलेले छायांकीत प्रतीचे दोन संच व फोटासह हजर रहावे. अन्यथा आपणास या **सशस्त्र पोलीस शिपाई पदाची आवश्यकता नसल्याचे गृहीत धरुन आपली निवड रदद करण्यात येईल, त्याचप्रमाणे यापुढे सदर पदाबाबत आपला कोणताही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही, याची सर्व गैरहजर उमेदवार यांनी नोंद घ्यावी**.

सदरची तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी उमेदवारांच्या माहीती करीता यापुर्वी महाराष्ट्र पोलीस दलाच्या **www.mahapolice.gov.in** व राज्य राखीव पोलीस दलाच्या **www.maharashtrasrpf.gov.in** या संकेतस्थळावर तसेच राज्य राखीव पोलीस बल गट क्र.5 दौंड येथील मुख्य प्रवेशव्दार येथे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

ठिकाण:- राज्य राखीव पोलीस बल गट क्र.5 दौंड

दिनांक :-03/08/2023

**( विनीता साहू )** भापोसे

समादेशक,

राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.05, दौंड